I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

पोलीस स्टेशन पारशिवनी जि. नागपूर (ग्रा.)

1. District (जिल्हा): नागपुर ग्रामीण P.S. (पोलीस ठाणे): पारशिवनी Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0519 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 14/08/2026 09:55 वाजता

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): मधले दिवस Date from (दिनांक पासून): 12/08/2026 Date To (दिनांक पर्यंत): 13/08/2026

Time Period (कालावधी): Time From (वेळेपासून): 14:30 तास Time To (वेळेपर्यंत): 18:30 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा): Date (दिनांक): 13/08/2026 Time (वेळ): 19:20 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ): Entry No. (नोंद क्र.): 009 Date and Time (दिनांक आणि वेळ): 14/08/2026 07:32 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): दक्षिण, 08 कि.मी. Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): मौजा तामसवाडी फाटा,पारशिवनी

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

Scanned with OKEN Scanner

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): सरतर्फे श्री.संतोष किशनराव जाधव

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1985

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

S. No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्र क्रमांक)

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्ता प्रकार)	Address (पत्ता)::
1	वर्तमान पता	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , नागपुरनागपुर शहर, महाराष्ट्र, भारत
2	स्थायी पता	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , नागपुरनागपुर शहर, महाराष्ट्र, भारत

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-9503738305

Scanned with OKEN Scanner

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

S. No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address(वर्तमान (पत्ता))
1	विशाल तुकाराम मंडगीकर			1. कार्यालय उप अधीक्षक,Town/Village (शहर / गाव): भुमी अभिलेख पारशिवनी,Tehsil (तहसील): पारशिवनी,Police Station (पोलीस ठाणे): पारशिवनी,District (जिल्हा): नागपुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S. No. (अ.क्र.)	Propertty Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (विवरण)	Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये)
1	इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान	मोबाईल फोन	आयफोन 16 प्रो मॅक्स IMEI 359296247472260	25,000.00
2	इतर	यंत्र-उपकरण/उपसाधन	2 सॅनडीस्क कंपनीचे 32 जीबी चे मेड इन चायना मेमोरी कार्ड	1,000.00

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) : 26,000.00

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

S. No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.)

Scanned with OKEN Scanner

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

फिर्याद पोलीस

स्टेशन पारशिवनी,नागपूर

दिनांक: 14/08/2026

नाव:- श्री.संतोष किशनराव जाधव, वय 41 वर्ष, व्यवसाय-नौकरी (पोलीस निरीक्षक),लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर रा. मानेवाडा,बेसा रोड, नागपूर मो.क्र. 9503738305

मी वर दिलेल्या पत्यावर परिवारासह राहत असुन, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर कार्यालयात पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 12/08/2026 रोजी तक्रारदार श्री. पवन विष्णुजी वानखेडे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर कार्यालयात एका लोकसेवका विरुध्द लाच मागणीची तक्रार दिली तक्रारदार यांनी दिलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

तक्रार

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नागपूर दिनांक 12.08.2026

वेळ:- 14/30 वा.

नाव:- श्री.पवन विष्णुजी वानखेडे, वय 28 वर्ष, व्यवसाय - शेती, रा. हिंगणा- बाराभाई, ता. पारशिवनी

जि. नागपूर, मो.क्र. 7776897130

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नागपूर कार्यालयात समक्ष हजर येवुन तक्रार देतो की, मी उपरोक्त पत्यावर परिवारासह राहत असुन शेतीचे काम करतो. माझे घरी माझी आई-वडील,आजी, तसेच लहान भाऊ असे सोबत राहत असतो.

आमची मौजा हिंगणा - बाराभाई, त.सा.क्र.10, ता. पारशिवनी, जि. नागपुर येथे सर्वे नं 41 अन्वये 3.78 हेक्टर आर अशी वडीलोपार्जीत शेती आहे. सदर शेती माझी आजी नामे छबुबाई दिंगाबरजी वानखेडे यांचे नावे होती. त्यामधुन माझा लहान भाऊ नामे प्रविण विष्णुजी वानखेडे याचे नावे दिनांक 01 /01/2021 रोजी तिन एकर शेती खरेदीची रजिस्ट्री झाली आहे. तसेच माझे नावे तिन एकर शेती खरेदीची रजिस्ट्री झाली आहे. व माझे आजीचे नावे शिल्लक असलेले चार एकर शेती आहे.

मी, माझी आजी व लहान भाऊ असे आम्ही तिघांचे शेतीची पोट मोजनी करून सातबारा वेगळा करण्याकरिता मी व माझा भाउ प्रविण वानखेडे असे दोघे दिनांक 25/03/2026 रोजी भुमी अभिलेख, पारशिवनी कार्यालयात गेलो. माझे भावाने फॉर्म भरुन त्याची सही करुन पोट मोजणी करीता अर्ज केला. दिनांक 25/3/26 रोजी आम्ही केलेल्या अर्जा वरुन त्या कार्यालयातील कार्यरत असणारे श्री विशाल तुकाराम मंडगीकर, भुकरमापक,कार्यालय उप अधीक्षक, भुमी अभिलेख, पारशिवनी यांनी आमचे शेतात येवुन शेतीचा दिनांक 20/07/2026 सर्वे करून मोजणी केली आहे. तेव्हा त्यांनी मला कार्यालयात येण्यास सांगीतले. मी कार्यालयात जाउन भेटल्यानंतर मला श्री

विशाल तुकाराम मंडगीकर यांनी सांगितले की, "मोठे साहेब कार्यालयात हजर नसल्याने नंतर फोन करून बोलवतो. असे म्हणाल्याने मी परत गेलो.

दिनांक 10/08/2026 रोजी मला श्री विशाल तुकाराम मंडगीकर, यांनी त्याचे मो.क्र.7887964585 वरून माझे मो. क्र. 7776897130 वा 05/34 वा कॉल करून मला तामसवाडी फाटा येथे बोलावले. मी लगेच तामसवाडी फाटा येथे गेलो. तेथे जावुन मी श्री विशाल यांना भेटलो. तेव्हा श्री विशाल तुकाराम मंडगीकर मला म्हणाले की, " तुझी शेती नकाशाचे बाहेर जात आहे. त्याकरीता हद्द कायम मोजनी टाकावी लागेल, त्यानंतर पोट हिस्सा मोजनी टाकावी लागेल या प्रोसीजर ला एक ते दिड वर्षे लागेल. जर तुला ही मोजणी लवकर करायची असेल तर रू. 75,000/- दयावे लागेल." असे बोलुन गैरअर्जदार श्री विशाल मंडगीकर यांनी मला रू. 75,000/- लाच रक्कमेची मागणी केली. गैरअर्जदार श्री विशाल मंडगीकर यांनी मागितलेली लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्यामुळे त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही करण्यासाठी सदर तक्रार देत आहे.

माझे वरील नमुद गैरअर्जदार यांचेशी कोणतेही आपसी आर्थिक देवाण घेवाण नाही किंवा आपसी वैमनस्य नाही, माझे कडे रू. 5,000/- असल्याने मी लाचेमध्ये देण्याकरीता 5,000/- रुपये सोबत आणले आहे. सदरहु रक्कम मी माझे बचतीतुन जमा केलेली आहे. तरी त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी म्हणुन मी स्वेच्छेने तक्रार देत आहे

स्वा/

(श्री. पवन विष्णुजी वानखेडे)

त्यानंतर आम्ही पोलीस निरीक्षक श्री संतोष जाधव, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून दोन्ही पंचांना तक्रारदार यांची ओळख करून दिली. त्यानंतर दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन तक्रारदार यांची स्वहस्ताक्षरातील व टंकलिखीत केलेली तक्रार पंचांना वाचण्यास दिली. त्यानंतर आम्ही पोलीस निरीक्षक, श्री संतोष जाधव, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर नी तक्रारदार यांचे सांगणेप्रमाणे टंकलिखीत केलेल्या तक्रारीवर व स्वहस्ताक्षरात दिलेल्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी, तक्रारदार यांनी व त्यानंतर आम्ही श्री संतोष जाधव, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर आम्ही तक्रारदारास गैरअर्जदार श्री विशाल तुकाराम मंडगीकर,भुकरमापक,कार्यालय उप अधीक्षक, भुमी अभिलेख, पारशिवनी,नागपूर ग्रामीण यांना देण्याकरीता वापरण्यात येणारी लाचरक्कम रू. 75,000/- सादर करण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी गैरअर्जदार श्री विशाल तुकाराम मंडगीकर,भुकरमापक, (वर्ग-3), कार्यालय उप अधीक्षक, भुमी अभिलेख, पारशिवनी,नागपूर ग्रामीण यांना देण्याकरीता रुपये 5,000/- (ज्यात रू. 500/- दराच्या 10 चलनी नोटा) आमचे कार्यालयात जमा केली.आणि उर्वरित लाचरक्कम म्हणुन लहान मुलांच्या खेळण्याकरिता वापरण्यात येणा-या 500/- रू. दराच्या 140 नकली नोटा रू.70,000/-) वापरण्याचे सर्वानुमते ठरले. यानंतर सर्वप्रथम गैरअर्जदार यांची लाचरक्कमेच्या मागणीबाबत पडताळणी करण्यात येणार असल्याने तक्रारदार यांनी जमा केलेल्या रू. 500/- दराच्या 10 नोटांना व लहान मुलांच्या खेळण्याकरिता

Scanned with OKEN Scanner

वापरण्यात येणा-या 500/- रू. दराच्या 140 नकली नोटा रू.70,000/-लावण्यात येणा-या अँथ्रासीन पावडरचे पंचांना प्रात्यक्षीक करून दाखवुन सदरच्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावुन त्या नोटा एका लिफाफ्यात ठेवुन कारवाईचे प्रात्याक्षिक करून दाखविले. तसेच व्हाईस रेकाॅर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना सविस्तर माहिती दिली.

पुढील लाच मागणी पडताळणी कार्यवाही दि.13/08/2026 रोजी आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरवुन तक्रारदार यांना दि.13/08/2026 रोजी पारशिवनी ते करंभाड रोड,पारशिवनी,नागपूर ग्रामिण येथे उपस्थित राहण्याच्या तसेच गोपनियतेबाबत सुचना दिल्यात याबाबत दिनांक 12/08/2026 रोजी कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे

दिनांक 13/08/2026 रोजी सापळा पडताळणी करणे असल्याने तक्रारदार यांनी व्हॉट्अप व्दारे मोबाईलवर संपर्क केला असता, आम्ही तक्रारदाराला कळविले की, आम्ही, पंच व सापळा पार्टी असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर कार्यालयातुन रवाना झालो आहे. आपण ठरल्याप्रमाणे पारशिवनी ते करंभाड रोड,पारशिवनी, नागपूर ग्रामिण येथे हजर राहण्यास सांगितले.

यानंतर दिनांक 13/08/2026 रोजी आम्ही, दोन्ही शासकीय पंच व सापळा पथकातील सर्व सदस्य खाजगी तसेच शासकीय वाहनाने सापळया संबंधीत सर्व साहीत्य घेवुन तसेच तक्रारदार हे त्यांचे दुचाकी वाहनाने पारशिवनी ते करंभाड रोड,पारशिवनी,नागपूर ग्रामिण हजर होते.यानंतर आमचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील सदस्यांनी तक्रारदार यांची सापळा पडताळणी पुर्वीची अंगझडती घेतली व तक्रारदार तसेच पंच क्र. 1 यांना सापळा पडताळणीसंबंधाने सुचना दिल्यात. त्यानंतर आम्ही सदर ठिकाणावरुन व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून पंच क्र. 1 श्री. गौतम आनंदराव कांबळे यांचे आवाजात ध्वनीमुद्रीत करून तक्रारदार यांचे गळयात दो-याच्या सहाय्याने अडकवला. तेथुन तक्रारदार व शासकीय पंच क्र. 1 श्री.गौतम आनंदराव कांबळे असे दोघेही तक्रारदार यांचे दुचाकी वाहनाने गैरअर्जदार श्री विशाल तुकाराम मंडगीकर,पद-भुकरमापक,कार्यालय उप अधीक्षक, भुमी अभिलेख, पापारशिवनी,जि.नागपूर यांचेकडे लाचमागणीच्या पडताळणी करीता कार्यालय उप अधीक्षक, भुमी अभिलेख, पारशिवनी,जि.नागपूर कार्यालयाकरीता रवाना केले. कार्यालय उप अधीक्षक, भुमी अभिलेख, पारशिवनीजि.नागपूर येथे पोहचल्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 हे दोघेही त्या ठिकाणी गैरअर्जदार यांना कार्यालयात जावुन भेटले व गैरअर्जदार श्री विशाल तुकाराम मंडगीकर, यांचेशी तक्रारदार हे त्यांचे कामासंबंधी बोलले .तक्रारदार यांनी त्यांचे कामासंबंधाने गैरअर्जदार श्री. विशाल तुकाराम मंडगीकर यांचेशी बोलणी केली, त्यावर गैरअर्जदार श्री. विशाल तुकाराम मंडगीकर हे तक्रारदार यांना म्हणाले, “ तुच सांग,”. तक्रारदार म्हणाले यामधले मला काही माहीत नाही.” तुम्हीच सांगा. त्यावर गैरअर्जदार यांनी मोबाईल मधील कॅक्युलेटर चालु करून त्यावर 30,000/- असे टाईप करून तक्रारदास दाखविले, त्यावर तक्रारदार हे बोलले की साहेब कॅल्सीवर दाखवत आहेत तुम्ही ? तिस पर्यत करून देतो. त्यावर गैरअर्जदार यांनी मान हलवुन इशारा केला. असे स्वरूपाचे बोलने झाले. . त्यावेळेस गैरअर्जदार यांनी लाच रक्कमेची स्पष्ट मागणी केली. त्याचे सविस्तर वर्णन संभाषण स्क्रिप्ट व पडताळणी व सापळा कार्यवाही पंचनामा मध्ये आले आहे

गैरअर्जदार श्री विशाल तुकाराम मंडगीकर,भुकरमापक,कार्यालय उप अधीक्षक, भुमी अभिलेख, पारशिवनीनागपूर ग्रामीण , रा. आँरेज सिटी पार्क, येरखेडा, कामठी, निमीश गौरे यांचे घरी किरायाने,

जि.नागपूर यांनी तक्रारदार यांचे मौजा हिंगणा-बाराभाई, त.सा.क्र.10, ता. पारशिवनी, जि. नागपुर येथे सर्वे नं 41 अन्वये 3.78 हेक्टर आर अशी वडीलोपार्जीत शेतीची पोट मोजनी करून तक्रारदार, तक्रारदाराची आजी व तक्रारदाराचा लहान भाऊ असे तिघांचे नावे सातबारा वेगळा करण्याकरिता एकुण 75,000/- रू. अशी लाचेची मागणी करून तडजोडीअंती एकुण 30,000/- रू. लाचेची मागणी करून शासकीय पंच क्र.1 यांचे समक्ष स्विकारण्याची तयारी दर्षविली. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 दोघेही मिळुन तक्रारदार यांचे दुचाकी वाहनाने सापळा पार्टी थांबुन असलेल्या ठिकाणी परत आले.

तेव्हा आम्ही तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर बंद करून तक्रारदार यांची सापळा पथकातील सदस्य यांचे मार्फतीने पडताळणीनंतरची अंगझडती घेवुन, व्हॉईस रेकॉर्डर लॅपटॉपला जोडुन तक्रारदार व गैरअर्जदार श्री विशाल तुकाराम मंडगीकर यांच्यातील रेकॉर्ड झालेले संभाषण एकुन तक्रारदार यांना तसेच पंच क्र. 1 श्री. गौतम आनंदराव कांबळे यांना घडलेली सर्व हकीकत विचारून गैरअर्जदार यांची लाचरक्कमेची मागणी असल्याबाबत खात्री केली. दिनांक 13/08/2026 रोजीच्या पडताळणी व सापळा कार्यवाही पंचनामा मध्ये सविस्तर हकीकत नमुद करण्यात आली आहे.

पडताळणी व सापळा कार्यवाहीत गैरअर्जदार श्री विशाल तुकाराम मंडगीकर,भुकरमापक,कार्यालय उप अधीक्षक, भुमी अभिलेख, पारशिवनी,नागपूर ग्रामीण यांनी पंचासमक्ष तक्रारदाराचे मौजा हिंगणा-बाराभाई, त.सा.क्र.10, ता. पारशिवनी जि. नागपुर येथे सर्वे नं 41 अन्वये 3.78 हेक्टर आर अशी वडीलोपार्जीत शेतीची पोट मोजनी करून तक्रारदार, तक्रारदाराची आजी व तक्रारदाराचा लहान भाऊ असे तिघांचे नावे सातबारा वेगळा करण्याकरिता तडजोडीअंती एकुण 30,000/- रू. अशी लाचेची मागणी केली असल्याची खात्री केली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):

(1) Registered the case and took up the investigation **(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** KISHOR ANANDRAO SHERKI (पोलीस निरीक्षक) or **(किंवा):**

(2) Directed (Name of I.O.) **(तपास अधिका-याचे नाव):** Rank **(हुद्दा):**

No. (क्र.): to take up the Investigation **(तपास करण्याचे अधिकार दिले)** or **(किंवा)**

(3) Refused investigation due to **(ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
or **(किंवा)**

(4) Transferred to P.S. **(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

District **(जिल्हा):**

Scanned with OKEN Scanner

on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): KISHOR ANANDRAO SHERKI

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): 14801000362KASM8101C

14/8/26
PI संतोष जाधव
ACB

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Scanned with OKEN Scanner

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

Physical features, deformities and other details of the suspect/accused: (If known / seen)
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील

S. No. (अ.क्र)	Sex (लिंग)	Date / Year Of Birth (जन्मतारीख / वर्ष)	Build (बांधा)	Height (cms) (उंची(सें.मी))	Complexion (रंग)	Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा)
1	2	3	4	5	6	7
1	पुरुष	1993		-		चेचक: क्र.

Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्ट्ये)	Teeth (दात)	Hair (केस)	Eye (डोळे)	Habit(s) (सवयी)	Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी)
8	9	10	11	12	13

Language/Dialect (भाषा/बोली)	Place of (चे ठिकाण)					Others (इतर)
	Burn Mark (भाजल्याच्या खुणा)	Leucoderma (कोड)	Mole (तिळ)	Scar (व्रण)	Tattoo (गोंदण)	
14	15	16	17	18	19	20

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिले यास फक्त त्यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)

Scanned with OKEN Scanner